




# निशांत

भाग - १



## जीवन उपयोगी ज्ञान

निशांत - भाग १

ऑगस्ट १९९६

संपादक / प्रकाशक

महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ

दिंडोरी - ४२२ २०२

*लेखन व संकलन सहभाग*

सकाराम गावित अर्जून दारोळे

पोपट बोर्डे यादव माघाडे

लुकस दिवे साविओभाऊ

*कला सजावट:* गॉडफ्री डिलीमा

*कम्पुटर मुद्रण:* लुकस दिवे

*(खाजगी वितरणासाठी)*

# निशांत

भाग - १

# आमचे मनोगत

" निशांत " ची ही पहिली मालीका गावातल्या तळा गळातील युवक - युवतींसाठी लिहीली जात आहे. प्रत्येक गावामध्ये अशा व्यक्ति आहेत की ज्यांना सामाजीक कारणास्तव औपचारिक शिक्षणातून बाहेर पडावं लागतं किवां बाहेर ढकललं जातं. परंतु ह्यांपैकी अनेक जण आशा बाळगतात की स्वतःच्या पायावर उभे राहून स्वावलंबी जीवन जगावं. ह्यां इच्छूक व्यक्तिनां " निशांत " आम्ही समर्पीत करतो.

जीवन उपयोगी ज्ञान स्वावलंबनाच्या वाटेवर पहिली पायरी आहे. असे ज्ञान आपल्या भागातल्या सोप्या व प्रचलित भाषेत सादर करण्याचा हा आमचा प्रयत्न आहे. ही मालिका वापरणाऱ्या प्रत्येक व्यक्तिची ज्ञानचिकित्सा ऊफाळून यावी जेणेकरून आणखी ज्ञान प्राप्त करण्यास त्यांचे धाडस वाढावे व स्वतःचे भविष्य आपल्याच हाताने घडवता यावे, हीच आमची मनिषा.

ज्ञानाचा शोध घेण्यास आम्हाला ही अनमोल संधी लाभली म्हणून आपले चिकित्सक बंधु-बधिनिनां शतशः धन्यवाद. तसेच ह्या पुस्तकांचा मालिकेच्या उगम काळापासून म. प्र. से. मंडळाचे संचालक, ब्रायनभाऊ, ह्यांचा पाठींबा व मार्गदर्शन लाभले, तसेच म. प्र. से. मंडळाचे अनेक विस्तार अधिकाऱ्याचे सहाय्य व सहकार्य लाभले. नाहीतर हे स्वप्न अधुरे राहीले असते. यात तीळ मात्र शंका नाही; या सर्वांना मनापासून धन्यवाद

संपादक मंडळ

२ा।वि ओ भ।ऊ

# अनुक्रमणिका

गद्य विभाग:


| | | |
|---|---|---|
| १. | कोतवाल | १ |
| २. | पोलीस पाटील | ४ |
| ३. | सरपंच | ८ |
| ४. | जमीन | १४ |
| ५. | तलाठी | १७ |
| ६. | घर | २१ |
| ७. | ग्रामसेवक | २३ |
| ८. | सर्कल | २६ |
| ९. | तहसीलदार | २९ |
| १०. | जिल्हाधिकारी | ३४ |
| ११. | राज्य महसुल यंत्रणा | ३७ |


पध्य विभाग


| | | |
|---|---|---|
| १. | खरा तो ऐकची घर्म | ३८ |
| २. | नमो तुला रे | ३९ |
| ३. | नातं झाडाशी | ४० |
| ४. | आसू | ४१ |
| ५. | पाटी न पेंन्सील | ४२ |
| ६. | दारू सुटल | ४३ |
| ७. | मिसरी | ४४ |

धडा १ ला.

# कोतवाल




संध्याकाळची वेळ होती. लोक शेतातून घरी येत होते. गावात कोणीतरी दवंडी देत होते. दवंडीचा आवाज ऐकूण लोक त्या दिशेने एकत्र जमा झाले. दवंडी ऐकू लागले.कोण बरे दवंडी देत होते?

हा तर आपल्या गावचा कोतवाल.

काय बरे याचे काम ?

गाव पातळीवर तलाठी व सर्कल यांना महसुलाचे कामात मदत करण्यासाठी कोतवालाची नेमणूक केली आहे. हा शासनाचा पगारदार नोकर आहे.

याचे काम असे :

१ शेत सारा गोळा करणे.

२ पोलीस पाटील यांना गुन्हयाच्या व गुन्हेगारांच्या शोधात मदत करणे.

३ सरकारी अधिकाऱ्यांना मदत करणे.

४ गावाला सार्वजनीक बैठकीच्या ठिकाणी बोलावणे.

वरील सर्व कामे कोतवाल करतो.

## चर्चेसाठी विषय:

आपल्या गावात दवंडी होते का?
कोणकोणत्या विषयाबद्दल दवंडी दिली जाते?
दवंडी दिल्यावर लोक एकत्र येतात का?
लोक कोठे एकत्र जमतात? सर्वच लोक चर्चेत सहभागी होतात का?
सर्वांना सारखाच न्याय मिळतो का?

## लेखन सराव:

| क | त | व | ल |
|---|---|---|---|

मुळ अक्षरे सराव आणि वाचणे. वरील अक्षरातुन शब्द बणवणे.

कल, लव, वत, कवल, वकल.


आता एक काना  वरील अक्षरांना देऊन त्या पासुन शब्द बनवू.

ऊदा. कावा,वात,ताल,काल,वाल,तलाव,कालव,कावकाव.

आपण आता मात्रा देऊ. (काना आणि मात्रा)

ऊदा. तोल,लोक,कोल,तोता.

## लेखन सरावः






धडा २ रा

# पोलीस पाटील

गावातील मारुतीच्या मंदिरासमोर सर्व गावकरी एकत्र जमले होते. गावकरी एकमेकात काहितरी कानगोष्टी (कुजबुज) करत होते. काहीवेळाने पाटील आले. सर्व शांत बसले. पाटील बसल्यावर त्यांनी हाऱ्या व नाऱ्या यांना पुढे येण्यास बजावले.



हाऱ्याने नाऱ्याचे शेत चारले या वरुन त्यांचे भांडण झाले. हे भांडण गावातल्या गावातच मिटवायचे म्हणून

गावातले लोक एकत्र जमले होते.

पाटील: नाऱ्या काय भानगड आहे तुझी?

नाऱ्या: पाटील माझे शेत हाऱ्याच्या जनावराने खाल्ले.

पाटील: काय रे हाऱ्या तू याच्या शेतात गायी घातल्या का ?

हाऱ्या: हो, नजरचुकीने माझे जनावर नाऱ्याच्या शेतात गेले आणि त्याचे थोडेसे नुकसान झाले. मला ते कबुल आहे.

पाटील: परत तुझ्याकडुन अशी चुक व्हायला नको. तु पुन्हा अस करु नये म्हणून तुला ५१ रुपये दंड भरावा लागेल. आणि आज पासुन जर कुणिहि आपली जनावरे दुसऱ्याच्या शेतात घातली तर या पेक्षा जास्त दंड भरावा लागेल.

सर्वांना पाटलाचा निर्णय आवडला आणि गावातला प्रश्न गावातच सुटला. बैठक संपली. पाटलाची कामे कोणती कोणती बरे ? अपघात,आत्महत्या,दखलपात्र गुन्हे गावाच्या शिवारात घडल्यास पोलीसांना वर्दी देणे. पुरावा जपून ठेवण्यासाठी पंचनामा करण्याचा अधिकार सुद्धा त्यांना आहे.

पाटलाला फक्त मानधन दिले जाते.

# पाटलाची नेमणूक प्रांता मार्फत होते.

चर्चेसाठी विषय:

आपल्या गावातील प्रश्न गावातच सोडवले जातात का ?

आपल्या गावात वाद झाल्यास लोक पोलीस ठाण्यात जातात का ?

आतापर्यंत आपण क,त,व,ल,तसेच काना आणि मात्रा शिकलो.

आज आपण दुसरी वेलांटी शिकू या.

अक्षर ओळख: | प | ट | ल



प, पा, पी, पो,

ट, टा, टी, टो,


ल, ला, ली, लो,

आपण शब्द तयार करु या.

पाटी, पापी, पापा, पाटा, टोल, लाल, लाटा,

पोट, पोपट, पाल, पीप, टोपली, लोटा, टोप.

लेखन सरावः



न्यायाचे राज्य झालेच पाहिजे.

गावाचे प्रश्न गावातच सोडवा.

सहकार्याने सर्वांचे हित साधते.

घडा ३ रा.

# सरपंच

कडक ऊन्हाळ्याचे दिवस होते.गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली. बाया दुरून डोक्यावर पाणी आणीत होत्या. दरवर्षी पाण्याचा टँकर गावात पाणी पुरवत होता. या वर्षी अजुनही टँकर गावात येत नव्हते,का बरे ? पिण्याचे पाणी कोठून आणावे ? जनावरांना पाणी कोठे पाजावे ? कपडे कुठे धुवावे ? टँकर गावात येण्यासाठी कुणाला सांगावे? हे प्रश्न प्रत्येक महिलांसमोर उभे होते. महिला आपसात बोलत होत्या.



सकू: काय कराव बाई, या मेल्या पाण्यासाठी ऊन्हातान्हात भटकावं लागतं.

लक्ष्मी: मला तर बाई त्या पाई दु:खणे आले. आमची



कमल घरी आली म्हणून थोडा आराम मिळाला.

तारा: मी तर कंटाळले बाई, एक तर इतक्या दुर ऊन्हात पायी जायचे आणि त्या झिऱ्यावर एक भांडं भरायला एक एक तास लागतो. नको बाई हे असलं जीवन.

सरू: अग बाई हा तर साऱ्या गावातील बायांनाच प्रश्न पडलाय. आपण असं करू हिराबाईला भेटायला जाऊ.

लक्ष्मी: ती काय आपल्याला हंडाभर पाणी थोडीच देणार ?

सरुः तंस नाही लक्ष्मीबाई, आपण तिला विचारु तुम्ही पाणी कोठूण आणता ? ती सुद्धा झिऱ्यावरुनच पाणी आणते. तिला किती त्रास होतो हे ती सांगेलच. मग आपण तिला सांगु : तुम्ही सरपंचाला सांगा, साऱ्या गावाला पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. टँकरची व्यवस्था करा.

सर्व बाया सरपंचाच्या घरी गेल्या. हिराबाईशी बोलू लागल्या. काही बाया भांडु लागल्या. रात्री सरपंच घरी आल्यावर हिराने सर्व सांगीतले.

हिराः अहो, आज गावातील बाया मला खुप भांडत होत्या.

सरपंचः का ? काय कारण?



हिराः गावाला प्यायला पाणी नाही. अजुन टँकर येत नाहित.

सरपंचः कुणाकुणाच्या बायका होत्या मला सांग. बघतो त्यांच्याकडे.

हिराः अहो अस म्हणूण थोडच चालेल. मला पण किती त्रास होतो. एवढ्या लांब पायी जायचं शिवाय ऊन्हाचा तडाखा, मला तर दुःखनच आलय. तुम्हाला काय, आंघोळीला पाणी मिळतं, जेवनाला पाणी मिळतं. तुमचं झालं. पण आम्हाला त्या पाण्यासाठी किती भटकावं लागतं याची तुम्हाला काय् कल्पना येणार? ऊद्याच तुम्ही तालुक्याला जा आणि टँकरची व्यवस्था करा.

सरपंच तालुक्याला गेले. दुसऱ्या दिवसापासुन गावात टँकर येऊ लागला.

कोण बरे हा सरपंच ?

तुमच्या गावात सरपंचआहे का ?

सरपंचाची कामे कोणती आहेत ?

सरपंच हा गावपंचायतीचा प्रमुख असतो.

सरपंचाची कामे पुढील प्रमाणे असतातः

१. गाव सभेचा अध्यक्ष होणे व सभा चालवणे.

२. गाव पंच्यायतीच्या कारभारावर लक्ष ठेवणे.

३. ग्रामसेवकाबरोबर गावपंचायतीचा जमाखर्च करणे.

४. गावपंचायतीला मिळणाऱ्या पैश्याच्या पावत्या देणे.तशी व्यवस्था करणे.

५. गावपंचायतीची ठेव (गावकीचा पैसा) सुरक्षीत ठेवणे.

६. विकासाच्या योजना राबवणे.(रस्ते,शिक्षण.)

७. गावपंचायतीतील कायदेविषयक बाबी व मान्य केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करणे.

८. दर सहा महीन्यांनी ग्रामसभा बोलावणे.

९. जवाहर योजना राबवणे.

## चर्चेसाठी विषयः

आपल्या गावाचा कारभार कोण चालवतो?

गावपंचायत कशी तयार होते?

गावपंचायतीचे कामे कोणकोणती?

सरपंचाची निवड कशी होते?

## अक्षर ओळखः

स र पं च


आज आपण अनुस्वार शिकणार आहोत.

आतापर्यंत आपण क, त, व, ल, प, ट, स, र, च, हे शब्द शिकलो. यापासुन आपण शब्द अनुस्वार देऊन बनवू या.

संप, कंप, लंका, पंत, तंटा, वांती, लंपट, पंचर,

संतती, संपत्ती, संपली.

## अक्षर लिखाणः



या जगातील सर्व वस्तु सर्वांसाठी आहेत.

धडा ४ था.

# जमीन

एका गावात सकाराम डवर (म्हातारा) रहात होता. त्याला दोन मुले होती. दोघेही मुले शाळेत जात नव्हती. शेतात सुध्दा काम करीत नव्हती. जंगलात फिरणे , नदीमध्ये मनसोक्त पोहणे व घरी आल्यावर जेवण करणे या पलिकडे त्यांना काही येतच नव्हते. डवर विचार करू लागला आता माझे मरण जवळ आले. माझ्या मुलांचे कसे होईल. त्याला युक्ती सुचली. त्याने मुलांना जवळ बोलावले व सांगीतले,



बाळांनो मी शेतात धन पुरुन ठेवले. पण मला ते आठवत नाही. बस धनाच्या शोधात दोघेही निघाले. आखे शेत खणून काढले पण धन काही सापडले नाही. डवर म्हणाला मुलांनो हे बी घ्या व शेतात पेरा. मुलांनी बी पेरले. चांगले पिक आले. मुलांना खरे धन मिळाले. कष्टाचे फळ मिळाले. मुले कामाला लागली. डवरने सुखाने प्राण सोडला.

## चर्चेसाठी विषय:

आपल्या गावात किती लोकांना जमीन आहे ?

आपल्या गावात किती लोकांना जमीन नाही ?

आपल्या गावात कोणत्या प्रकारच्या जमीनी आहेत ?
ऊदा. गावठा,मालकी इ.

जमीन सर्वांना सारखीच आहे का ?

जमीनीच्या नोंदी कोण ठेवतो ?

## अक्षर वाचन:

| | | |
|---|---|---|
| ज | म | न |

ज जा जी जे जं


मा मा मी मे मं

न ना नी ने नं

## शब्द बनवा:

जमाना, नमाज, मामा, मामी, जामीन,
नमन, नाना,नानी, जनी, मेजवानी, मान.

अक्षर लिखानः



पाणी जीरवा माती आडवा

जमीनीतुन ऊत्पन्न वाढवा.

कसेल त्याची जमीन.

प्रत्येकाने आपल्या जमीनीचे चित्र (नकाशा) काढा.



धडा ५ वा.

# तलाठी

एका गावात दोन भाऊ राहत होते. ते नेहमी आपसात जमीनीवरुन भांडत. वडील वारल्यानंतर हे भांडण जास्तच होऊ लागले. गावातील वडील मंडळीने त्यांना सल्ला दिला की, तुम्ही जमीन वाटुन घ्या. म्हणजे तुमचे भांडण होणार नाही व इतरांनाही त्रास होणार नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी दोघेही तलाठ्याकडे गेले. तलाठ्याला त्यांनी वारसाची नोंद आणि खातेफोड करायला सांगीतले.

दोघांचे भांडण कशामुळे व्हायचे ?

गावकऱ्यांनी त्यांना काय सुचवले ?

ते खातेफोड करण्यासाठी कोणाला भेटले ?

तलाठ्याची कामे कोणती ?

तलाठ्याची कामे पुढील प्रमाणे:

१. तलाठ्याच्या हाती ३ किंवा ४ खेडे असतात.

२. त्या पैकी एक गाव सजेचे असते.इतर गावांना ठरलेल्या दिवशी भेट देतो.

३. लोकांच्या कामांसाठी ठरलेल्या दिवशी त्याने सजेवर हजर असावे.

४. जमीनीच्या कामासाठी लागणारे ७/१२ ,खाते उतारा इ. पत्रक वगैरे देणे व शासनाने ठरवलेली फी घेणे.

५. शेतसारा गोळा करणे व हिशोब ठेवणे.

६. सरकारसाठी ज्या रकमा तो लोकांकडून जमा करतो त्याच्या रितसर पावत्या देणे.

७. जमा महसुल १५ दिवसांच्या आत कोषागारात भरणे.



८. १५ सप्टेंबर पर्यंत आणेवारी काढून जाहीर करणे.पिक पहाणी व सीमा पहाणी करणे.

९. नैसर्गिक आपत्तीमुळे घराला,पिकाला आग लागल्यास पंचनामा करणे. त्यामुळे सरकार कडून नुकसान भरपाई मिळते.

१०. लोकांना नवीन रेशन कार्ड देणे.

११. खातेदारांना खातेपुस्तिका पुरविणे.

१२. सरकारी नोटीसा किंवा आदेश प्रसिध्द करणे.

१३. वारस नोंद व खातेफोड करणे.

चर्चेसाठी विषय:

तलाठी आपल्या गावात येतो का ?

तलाठी कोणकोणती कामे करतो ?

तुम्हाला कागदपत्र वेळेवर मिळतात का ?

कागदपत्र घ्यायला कुठे जावे लागते ?

अक्षर वाचन:


त ल ठ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| त | ता | ती | ते | तं |
| ल | ला | ली | ले | लं |
| ठ | ठा | ठी | ठे | ठं |

लाठी,ताठा,ठराव,ठक,ठग,ठार,ठावलला,(गवसला)

ठोसा,कठोर,कवठ,ठोके.

अक्षर लिखानः



शिक्षण घेऊ घरोघरी

वारसाची नोंद करु वेळेवरी



धडा ६ वा.

# घर

लहू गावात बऱ्याच दिवसापासुन रहातो.त्याला स्वतःचे घर नाही.स्वतःचे घर असावे हे त्याला नेहमीच वाटे. तो सकारामच्या मळ्यात रहात असे आणि मजुरी करीत असे. ऐके दिवशी ग्रामसेवक घरपट्टी घ्यायला सकारामच्या मळ्यात आला.

सकारामः रामराम भाऊसाहेब. अरे लहू पाणी आण भाऊसाहेबाला , आणि चहा ठेवायला सांग आत. या भाऊसाहेब या.

ग्रामसेवकः सकाराम हा लहू इथेच रहातो का ?

सकारामः हो भाऊसाहेब, त्याला ना घर ना दार.

ग्रामसेवकः किती वर्षापासुन आहे हा इथे ?

सकारामः पाच सहा वर्ष झाली. फार प्रामाणिक आहे.

ग्रामसेवकः सकाराम आताच मी तालुक्याहून आलो. घराची योजना मंजुर झालीय. याला पण आपण घर देऊ.

सखारामः चांगलं होईल भाऊसाहेब.

काही दिवसांनी लहुला घर मिळाले. तो सुखाने आपल्या नविन घरात राहू लागला.

चर्चेसाठी विषय:

आपल्या गावात बेघर लोक आहेत का ?

आपल्या गावात किती लोकांना मोठी घरे आहेत? कोणाची ?

आपल्या गावात सर्वांची घरे सारखी आहेत का ?

सर्वात लहान घरे कोणाची ?

आपले घर कसे असावे ? (दारे,खिडक्या,प्रकाश इ.)


घराचे चित्र काढा.

अक्षर वाचन:

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | घ | र | |
| घ | घा | घी | घे | घं |
| र | रा | री | रे | रं |

घार,घास,घरघर,घसरण,घट,घात,घाल,घासतेल,घाम,घावल, घमेलं,घाट,घमघमाट.

लेखन सराव:



ज्ञानाचा दिवा घरोघरी लावा.

सहकार्याने सर्वांचे हित साधते.

धडा ७ वा.

# ग्रामसेवक

तुकारामला घरात लाईट घ्यायची होती. त्यासाठी त्याला घराचा उतारा पाहिजे होता. घराचा उतारा कोठे मिळतो? त्याने रामाला विचारले.

रामा: गावपंचायत ऑफिसमध्ये जा. ग्रामसेवक तुला घराचा उतारा देइल. उतारा घे व विज बोर्डात जा तेथे ए - १ फॉर्म भर त्याला उतारा व टेस्ट रिपोर्ट जोड आणि विज बोर्डात दे. दहा दिवसात लाईट मिळेल.

## ग्रामसेवकाची कामे कोणती?

१. गावपंचायतीचे अंदाजपत्रक तयार करणे.
२. घरपट्टी, दिवापट्टी, पाणीपट्टी वसुल करणे.
३. नमुना नंबर ८ मध्ये घराचा व गावठाणाच्या जागेचे मोजमाप करणे, घराचा उतारा देणे.
४. गावाच्या विकासासाठी पंचायतीच्या निरनिराळ्या योजना राबवणे.ऊदा.शाळा,रस्ते,पाणी,विज ई.
५. गावातील लोकांची जन्ममृत्यूची नोंद ठेवणे.
६. गावात साथीचे रोग पसरू नये म्हणून पाणी शुध्दीकरन करणे (विहिरीत,बोरवेलमध्ये टी सी एल टाकणे.) व आरोग्य अधिकाऱ्यांना कळवणे.

७. गावठाणच्या जागेवर वृक्षारोपण करणे.

८. ग्रामसभा घेणे.

अक्षर वाचन:

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ग | म | स | व | क |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ग | गा | गी | गे | गं | ग्र |
| म | मा | मी | मे | मं | म्र |
| स | सा | सी | से | सं | स्र |
| व | वा | वी | वे | वं | व्र |
| क | का | की | के | कं | क्र |



या अक्षरांपासुन आपण शब्द बनवू या.

गवत, गारा, गंमत, गावरान, जंगल, गाव, गाठ, गंठा, गवसला गावठा.


आज आपण जोड अक्षर शिकणार आहोत.

ग र्

ग पूर्ण व अर्धा र् मिळून ग्र बणतो.

सेक्रेटरी, क्रम, चक्रम, चक्र, वक्र,व्रत,ग्राम.

अक्षर लिखाणः



आमचे भविष्य आमच्या हातात आहे.

## धडा ८वा. सर्कल

धोंडीराम व महादू यांच्या बांधाला बांध आहे. धोंडीरामने महादूच्या जमीनीत बांध सरकवला. त्यांच्यात वाद निर्माण झाला. महादू तलाठी व सर्कल भाऊसाहेबांना भेटला. त्यांनी महादूला भूमी अभिलेखा खात्याकडे अर्ज करायला सांगीतला. तेथे फी भरल्यावर जमीन मोजण्यासाठी त्यांचे लोक येतील.त्यांच्या सोबत आम्ही येऊ व जमीनीचे मोजमाप करु.

चर्चेसाठी विषय:

या दोघामध्ये वाद कशावरुन होता ?

महादू कोणाला भेटला ?

तलाठ्याने कोणाची भेट घ्यायला सांगीतल ?

सर्कल भाऊसाहेबांची कामे कोणती ?

आपल्या गावात असे अतीक्रमण आहे का ?

सर्कलकडे ३० ते ४० गावे असतात. तलाठी व तहशिलदार यांच्या मधला दुवा म्हणजे सर्कल होय.

सर्कलची कामे कोणती ?

१. हद्दीच्या खुनांची पहानी, पिक पहानी, आणेवारीचा

अंदाज, तगाई संबंधी कामाची पहानी आणि सरकारी जमीनींवरील बेकायदेशीर अतिक्रमणाचा शोध घेणे.

२. शेतकी व इतर विषयाचे सांख्यिकी विवरण तयार करणे आकढेवारीचा तक्ता तयार करणे.

३. गाव अधिकाऱ्यांवर अधिकार अभिलेख, हस्तांतर अभिलेख, कूळ अभिलेख तयार करणे व सतत तयार ठेवणे या संबधि लक्ष ठेवणे.

४. शेतसारा वसुली निरीक्षण व परीक्षा करणे.

५. तहसीलदार वेळोवेळी सांगेल ती कामे करणे.



अक्षर वाचन:

स क ल


आज आपण वरील तीन अक्षरांबरोबर रफार शिकणार आहोत.

स + र् + क + ल


अर्धा चंद्र देऊन आतापर्यंत शिकलेल्या अक्षराद्वारे शब्द तयार करु या.

सर्कस, तर्क, गर्क, सर्व, सर्प, नर्सरी, सार्वजनिक, वर्तन.

अक्षर लेखन:



जमीनीच्या बांधावर झाडे लावा.



धडा ९ वा.

# तहसीलदार

जून महिना सुरु झाला. शाळा सुरु झाल्या. शाळेत शिक्षकांनी मुलांना सुचना दिली की, फी माफीसाठी जाती ऊत्पन्नाचा दाखला घेऊन येणे. पांडुचे मुलं शाळेतुन घरी आले. पांडुला जाती ऊत्पन्नाचा दाखला आनण्यास सांगीतले.पांडु विचार करीत बसला. एवढ्यात सदु समोरुन आला.

सदुः रामराम पांडोबा, कसला विचार चाललाय?

पांडुः सदुभाऊ पोरांना जाती ऊत्पन्नाचा दाखला पाहिजे.

सदुः ह्यात तीचे,त्यात काय विशेष.चल मी येतो तुझ्या सोबत. तहसील कचेरीत हे दाखले मिळतात.

दोघेही तहसील कचेरीत जातात व दाखले आणतात.

## चर्चेसाठी विषयः

१. पांडुचे मुलं शाळेतुन घरी का आले ?

२. जाती ऊत्पन्नाचे दाखले घेण्यास कोण व कोठे गेले?

३. सदर दाखले त्यांना मिळाले का? कोणी दिले ?



## ऊत्पन्नाचा दाखला कसा काढावा?

तलाठ्याची ऊत्पन्ना विषयीची सिफारस लागते. तहसील कचेरीत फॉर्म मिळतो तो भरुन त्या फार्मला तलाठ्याची सिफारस जोडावी. त्यावर तहसीलदारांची सही व शिक्का घ्यावा.

## जातीचा दाखला कसा काढावा ?

स्वतःचा किंवा घरातील कोणत्याही व्यक्तीचा शाळा सोडल्याचा दाखला घेणे. तहसील कचेरीत १० रुपयाचे प्रतिज्ञापत्र लिहून घेणे. दोन्हीही तहसीलदारांना देणे. ८-१० दिवसांनी तहसील कार्यालयात सदर दाखला मिळेल.

तहसीलदाराची कामे पुढील प्रमाणेः

तहसील म्हणजे तालुका. तालुक्याचा प्रमुख अधिकारी म्हणजे तहसीलदार.



तहसीलदाराला जमीन महसुलासंबंधित असणारी अनेक प्रकारची कामे करावी लागतात. उदा. महसुल जमा करणे, पिकांची आणेवारी काढणे,मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक यांना योग्य ते मार्गदर्शन करणे,उपजिल्हाधिकाऱ्याला अहवाल सादर करणे,तालुक्यात नैसर्गिक आपत्ती ओढावल्यास त्याचा अहवाल त्वरीत जिल्हाधिकाऱ्याला सादर करणे,महसुलाबाबतचा कोणताही अर्ज दाखल करावयाचा असल्यास तो प्रथम तहसीलदाराकडे येतो. व त्यावर निर्णय घेतल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्याकडे जातो. या व इतर अनेक प्रकारची कामे तहसीलदाराला करावी लागतात.

अक्षर वाचन:

त [ह] स ल [द] र

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| त | ता | ती | ते | तं | त्र | र्त |
| ह | हा | ही | हे | हं | | |
| स | सा | सी | से | सं | | र्स |
| ल | ला | ली | ले | लं | | र्ल |
| द | दा | दी | दे | दं | द्र | र्द |
| र | रा | री | रे | रं | | |


हेद,दाद,दही,दादा,दाह,हाकला,हेला,दार,दरारा,दसरा, हाल,हालवा.

आत्तापर्यंत शिकलेल्या अक्षराची यादीः


क त व ल प ट स र च ठ ग ह द

तसेच काना, मात्रा, दुसरी वेलांटी, अनुस्वार, रफार, आणि जोड अक्षर.

अक्षर लिखानः



न्यायाचे राज्य झालेच पाहिजे.



धडा १० वा.

# जिल्हाधिकारी

चांदनी गावात नविन पाझर तलाव झाला. तलावात बऱ्याच लोकांच्या जमीनी गेल्या. काही लोक भूमिहीन झाले. तलावात गेलेल्या जमीनीचा मोबदला मिळावा म्हणून लोक भूसंपादन अधिकाऱ्याकडे गेले. पण मोबदला लवकर मिळत नव्हता. लोक एकत्र आले.

त्यांनी जिल्हाधिकाऱ्याची भेट घेतली व त्यांना सविस्तर वृत्त सांगीतले. त्यांनी चांदनी गावातील लोकांची अडचण लवकर दूर करावी असे संबंधीत अधिकाऱ्याला बजावले.

## चर्चेसाठी विषय:

गावातील लोकांची समस्या कोणती होती ?

ही समस्या कशावरुन निर्माण झाली ?

गावातील लोकांनी काय केलं ?

## जिल्हाधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्ये:

जिल्हाधिकारी जिल्ह्याचा मुख्य महसुल अधिकारी म्हणून राज्य शासनातर्फे काम पाहतो व महसुल जमा करतो. तो जिल्ह्याचे प्रशासकीय काम पहातो. महसुल दाव्याबाबत शोध घेण्याचा अधिकार त्याला आहे.

१) जमीन महसुल जमा करणे हे महत्वाचे काम आहे.

२) शासनाची मालमत्ता त्यांच्या ताब्यात असते.

३) भूमी-अभिलेख व्यवस्थित ठेवणे.

४) शेतीच्या जमीनीचा बिगर शेतीसाठी वापर करण्यास परवानगी देणे.

५) जिल्हा दंडाधिकारी म्हणून काम करणे.

६) जमीन महसुल कार्यालयाला भेट देणे व निरीक्षण करणे.

७) जमीन महसुल वसुल करण्यासाठी कायद्यान्वये कारवाई करणे.

८) जिल्हा परिषदा, बाजार समित्या,म्युनिसिपालिटी यांच्या निवडणुका घेणे व त्यावर देखरेख ठेवणे.

९) जणगनणा कार्यक्रमावर देखरेख ठेवणे.

१०) दुष्काळ,अन्नधान्याची तुट,पूर,साथींचे रोग, इत्यादी बाबतीत उद्‌भवणाऱ्या प्रश्नांवर तोडगा काढणे.

११) तुरुंग समितीवर काम करणे.

१२) जमीन महसुलासंबधित वेगवेगळ्या कार्यालयाला वेळोवेळी भेट देणे.

अक्षर वाचनः

ज  ल  ध  क  र

ज  जा  जि  जी  जे  जं

ध धा धि धी धे धं

जिजा, धन, जिजी,

आतापर्यंत आपण शिकलेले अक्षरः


क त व ल प ट स र ठ ह द ज ध न म ग घ च

काना, मात्रा, ऱ्हस्व व दीर्घ वेलांटी,अनुस्वार,व रफार.

जेवला,जिवलग,जंतर,जनक,धनवान,धन,

धनिक,धामन,धांदल,धारदार,धाव,धाव,धाकला,धाव,

## अक्षर लिखणः



आता आपण जोड अक्षर शिकूया.

दोन अक्षरांचे ऐकत्र येणे म्हणजे जोड अक्षर होय.

या पाठात ल्+ ह हे दोन अक्षर ऐकत्र आलेत. ल चा

ऊच्चार थोडा आहे म्हणजेच अर्धा ल आणि पुर्ण ह

असे दोन्ही मिळून ल्ह हे जोड अक्षर बनले.

ल्ह ऊच्चार करा

शब्द तयार कराः

प्रल्हाद, मल्हारी, जिल्हा, कोल्हा.

धडा ११वा.

# राज्य महसुल यंत्रणा

कमीशनर (३/४ जिल्हा)

जिल्हाधिकारी     जिल्हाधिकारी     जिल्हाधिकारी

(कलेक्टर) जमीन व कायदा सुव्यवस्ता पहाणे.

प्रांत     प्रांत     प्रांत

तालुका पातळी (गट) काही तालुक्यातील जमीन व सुव्यवस्था पहाणे.

तहसीलदार     तहसीलदार     तहसीलदार

तालुका दंडाधिकारी. एकाच तालुक्यातील जमीन व कायदा सुव्यवस्था इ. यंत्रणा पहाणे.

सर्कल     सर्कल     सर्कल

तलाठी     तलाठी     तलाठी

३/४ गावासाठी आकारा प्रमाणे.

# खरा तो एकची धर्म

खरा तो एकची धर्म
जगाला प्रेम अर्पावे ।।धृ।।
जगी जे हिन अती पतित
जगी जे हिन पद दलित
तया जाउन उठवावे ।जगाला... ।।१।।
सदा जे अर्त अती विकल
जयांना गांजती सकल
तया जाउन हसवावे ।जगाला ... ।।२।।
कुणा ना व्यर्थ शिनवावे
कुणा ना व्यर्थ हिनवावे
समस्था बंधू मानावे ।जगाला... ।।३।।
प्रभूची लेकरे सारी
तयाला सर्व हि प्यारी
कुणा ना तुच्छ लेखावे ।जगाला.. ।।४।।
असे हे सार धर्माचे
असे हे सार सत्याचे
परार्था प्राण हि द्यावे जगाला..। ।।५।।

# नमो तुला रे

नमो तुला रे जोडु हातांना
सांभाळ देवा तुझ्या मुलांना ।।धृ।।
सुबुध्दी दे रे सुशक्ती दे रे
सुनिती दे रे सन्मार्गी ने रे
नको ती छाया प्रकाश द्याया
संभाळ देवा तुझ्या मुलांना ।।१।।
नको ती दुःखे नको ते आसु
सदा मुखावर असु दे हासु
आनंद राहो दहा दिशांना
सांभाळ देवा तुझ्या मुलांना ।।२।।



# नातं झाडाशी

(मधुकर माघाडे)

कर तु कर विचार कर मनात तुझ्या तु लवकर
झाडासंग नातं जोडायचं,आयुष्य आपल वाढवायचं । धृ।

पुर्वी पाऊस भरपुर पडं
कारण होती बरीच जंगल झाडं
आता दिसतय ओसाड सारं,आता दिसतय ओसाड
का असं वनवन फिरायचं ,आयुष्य.......... ।१।

जंगल गेले तुझे झाले हाल
दवडू नको तू आता मोल
नाहीतर दिस अस येतील, अन्नपाण्यावाचुन मरशील
दोस्तीचं नातं टिकवायचं, आयुष्य........... ।२।

धूप होउन माती वाहून गेली
नाही उपयोगी शेती राहीली
थोडी थोडी पिकं वर आली ,अन् आपोआप करपुन गेली
म्हणून एकच ठरवायचं, आयुष्य.......... ।३।

जमीनीत पाणी खोल गेलय
पाऊस पडेना असं झालयं
हातांनी आमच्या सरण रचलय,वाटत आमच मरण आलं
कोणीच झाड नाही तोडायचं, आयुष्य....... ।४।

# आसू

आमचे आसू सगळेच पहातात
त्यावर सगळे चर्चा करतात
सगळेजण कळवळा आणतात
पण आमचे आसू गळतच रहातात ।।१।।
आमचे काम सगळेच पहातात
दाम कमी मिळतं सगळेच म्हणतात
दाम वाढवायचा वायदा करतात
पण घामाच्या धारा तश्याच गळतात ।।२।।
आमच्यावरचा अन्याय सगळेच पहातात
दुर करणयाच्या नुसत्या घोषणा करतात
अन्यायावर खूप सभा भरवतात
पण होणारे अन्याय चालूच रहातात ।।३।।
आमचे आसु पुसणार कोण?
आमचे दाम देणार कोण?
अन्याय दुर करणार कोण?
एकजूट आमची दुसरं कोण??



# पाटी न पेन्सील (प्रौढ शिक्षण शिबीर)

पाटी न पेन्सील घेऊ द्या की रं
मला बी शाळ्ेला येऊ द्या की ।।धृ।।
हाती पाटी ही घेऊ द्या
मला शाळेला येऊ द्या २
ज्ञानाच्या गंगेत न्हाऊ द्या की रं ।।१।।
आली ज्ञानाची योजना
गोरगरीबाच्या कल्याना
आहे समद्याच्या रक्षणा २
आरं मला बी मानाने जगू द्या की रं ।।२।।
दिवसामागुन दिवस गेले
लाख मोलाची संघी आली
वेळ शाळेची रं झाली २
खांद्याला खांदा भिडू द्या की रं ।।३।।






# दारु सुटल

सोपान कवी

कधि माझ्या घरधन्याची दारु सुटेल
दारुपायी नवरामाझा मेलेला उठल ।।धृ।।
रोज आईबापाची घेतोय आन
रोज फिऊन करतोय घान
कुठही ओकल आणि थुकल ।। १।।
घरात मजला त्रास देतो
घराबाहेर लोकांचा खातोय मार
नाक फुटल तर कधि डोक फुटल ।।२।।
या सरकारनं बर नाही केल
गावोगावी दारुचे लायसन दिले
सोपान कवीच गान सर्वांना पटल ।।३।।



# मिसरी

सखाराम गावित. एम.पी. एस एम.

आज बायको माझ्यावर रुसली (३)
इला घासायला पाहिजे मिसरी ।।धृ।।
एका दिवसाला दोन रुपयाची घसते
साऱ्या घरात थुंकत बसते
सारी थंकून घान केली ओसरी (३) ।।१।।
करते मोहन मद्रास पास
हिच्या तोंडाचा येतोय वास
सारी थुंकून घान केली ओसरी (३) ।।२।।

